महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८ / १०५११
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक :- ०९ / ०४ / २०१५

# परिपत्रक

विषय : कंपनीचे विविध कार्यक्रम ठरविताना अनुसरावयाची कार्यपद्धती व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र.उमावजअ/कार्य मार्गदर्शक सूचना/२०१४९ दि.१७.०६.२००३
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.८१ दि.१३.१०.२००६.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.१९१ दि.१९.११.२००८.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.४२७ दि.२९.०८.२०१२.

..........

पुवीच्या म.रा.वि.मंडळ व मंडळाचे विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या महावितरण कंपनीमधील अधिकारी/कर्मचारी यांना उद्घाटन, भुमिपूजन आणि तत्सम स्वरुपाचे विविध कार्यक्रम ठरविताना अनुसरावयाची कार्यपद्धतीबाबत संदर्भिय क्र.१ च्या परिपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच राजशिष्टारशी निगडीत विविध बाबी उदा.विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत तसेच शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे व तत्सम इत्यादी बाबींबाबत यापुर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचनाही निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता असे ही निदर्शनास आले आहे की, मा. उर्जा मंत्री यांनी स्वत: निदेशित केलेल्या कार्यक्रमासंदर्भात योग्य ती काळजी घेण्यात आलेली नाही, ही बाब व्यवस्थापकीय संचालक यांच्या निदर्शनास आली असून त्यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. यापुढे मा.मुख्यमंत्री व उर्जामंत्री आणि उर्जा राज्यमंत्री यांच्या कार्यक्रमासंदर्भात योग्य ती काळजी/खबरदारी घेण्यात यावी.

३. सर्व संबंधीतांना असेही सूचित करण्यात येते की, राजशिष्टाचार पाळण्याकरिता विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देणे, त्यांच्याकडून आलेल्या पत्र/अर्ज/ निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे या संदर्भात शासन परिपत्रक क्र.वीमस-२०११/प्र.क्र.४९/११/ १८(रवका) दि.१२.०१.२०१२ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करून त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच त्यात कुचराई व टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासन परिपत्रक दि.१२.०१.२०१२ मध्ये नमूद केल्यानुसार शिस्तभंग कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपानीच्या R-APDRP वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( डॉ.मुरहरी केळे )
कार्यकारी संचालक (मासं)